# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 12/05/2020 (मंगळवार)
(सकाळ)

## चोरी

1) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर मौजा बडेगाव येथे दिनांक 10/05/2020 ते दिनांक 11/05/2020 चे 23:00 वा. ते 08.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विठठल देवराव रोकडे, वय 48 वर्ष, रा. पारशिवनी यांचे सरकारी देशी दारूचे दुकानाचे समोरील दरवाज्याचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानाचे आतील स्टॉक रूमची भिंत सलाखीने फोडुन आतील रूममध्ये ठेवलेल्या देशी दारू चे स्टॉक पैकी 1) देशी दारू प्रत्येकी 180 एमएल चे 354 निपा एकुण 63,720 एमएल किमत 18,408/–रू. व 2) देशी दारू भिंगरी चे प्रत्येकी 750 एमएल चे 6 बॉटल एकुण 4,500 एमएल किमत 19,704/–रू. असा एकुण 38,112/– रू. चे मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार दिपक मानवटकर 9657580153 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावर कावरापेठ उमरेड येथे दिनांक 02/05/2020 ते दिनांक 11/05/2020 चे 12:00 वा. ते 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. मंजुषा शुद्धोधन लोखंडे, वय 47 वर्ष, रा. कावरापेठ, उमरेड या पतीचे उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे गेल्या होत्या. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घरामधील कपाटातुन 3 जोडे चांदीचे तोरडया 12 तोरडे कि. 1,200/–रू. व नगदी 7,000/–रू. असा एकुण कि. 8200/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा संजय कुलकर्णी 9422818062 हे करीत आहे.

3) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर मौजा ठोंबरा शिवार येथे दिनांक 11/05/2020 चे 01:00 वा. ते 03.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गिरीष रविशंकर मडामे, वय 32 वर्ष, रा. बालाजी नगर, उमरेड हा मराविविक मर्या उमरेड ग्रामीण कक्ष येथे सहाययक अभियंता म्हणुन काम करतो नमुद घटना ता वेळी व ठिकाणी गावातील ग्रमपंचायत चपराशी शेषराव रामदास गेडाम याने फोनदवारे सुचना दिली की, देवदंत नारायण शेंडे यांचे शेतात असलेल्या ट्रान्सफार्मर लघुदाब वाहीणीचे एकुण 7 पोलवरील ॲल्मुयनियम तार अंदाजे 1080 मीटर कि. 51,000 /–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा माहुरे 9657861201 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर मौजा काचुरवाही येथे दिनांक 11/05/2020 चे 17.00 वा. ते 17.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बालचंद शालीक नाटकर, वय 34 वर्षे, रा. काचुरवाही यांचे वडील नामे– शालीक मारोजी नाटकर(जखमी), वय 70 वर्षे, रा. काचुरवाही हे आपल्या शेतात हजर असतांना आरोपी नामे– प्रशांत सहादेव आबागडे, वय 25 वर्ष, रा. काचुरवाही याच्या बकऱ्यांनी फिर्यादीचे शेतातील वाग्ंयाचे पीक व ठेवलेला गहु खाऊन नुकसान केले. यावरून फिर्यादीचे वडील हे आरोपीस ''तुझ्या बकऱ्या सांभाळुन घेत नाही का, विकुन टाक'' असे म्हटले. या कारणावरून आरोपीने लाकडी काठीने फिर्यादीचे वडीलांना डोक्यावर व उजव्या हातावर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 324, 325, 427, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. प्रमोद कोळेकर 9834323960 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावरील चंद्रपुर नागपुर रोडवरील बुटीबोरी आय आय टि कॉलेज, जवळ येथे दिनांक 11/05/2020 चे 08:00 वा. ते 08:30 वा. दरम्यान अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–32/के–7448 क्रमांकाचा मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार नामे– अभिजीत सुरेश दरबेशवार, वय 40 वर्ष, रा. शिवाज वार्ड हिंगनघाट, जि. वर्धा यांचे गंभीर जखमी होवून मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कोडापे 9921415947 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर